**क्र.मुंमप्रविप्रा/बैठक/८९**

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
**वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे (पूर्व),**
**मुंबई - ४०० ०५१.**

दिनांक : ११ ऑगस्ट, १९९७

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक ३ जुलै, १९९७ (गुरुवार) रोजी झालेल्या ८९ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

सन्माननीय सदस्यांनी याबाबतीत काही हरकती असल्यास कृपया कळवाव्यात ही विनंती.

श्र. वि. आसगांवकर ११/८/९७

**(श्र.वि.आसगांवकर)**
**सचिव,**
**कार्यकारी समिती**

**प्रति,**
सर्व सदस्य,

**निमंत्रित :**
शासनाचे सचिव,
नगर विकास विभाग,
मंत्रालय

**प्रत अग्रेपित :**
विधी सल्लागार,
मुं.म.प्र.वि.प्रा.,
प्राधिकरणाचे अधिकारी

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या**
**८९ व्या बैठकीचे कार्यवृत्त**

---

| | | |
|---|---|---|
| **दिनांक** | : | ३ जुलै १९९७ (गुरुवार) |
| **वेळ** | : | दुपारी १२.३० वाजता |
| **सभास्थान** | : | सह्याद्री अतिथीगृह, बी.जी.खेर मार्ग, मलबार हिल, मुंबई—४०० ००६. |

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री. मनोहर जोशी<br>मा. मुख्यमंत्री | - | अध्यक्ष |
| श्री.सुरेश जैन<br>गृहनिर्माण मंत्री | - | सदस्य |
| श्री. राज पुरोहित<br>गृहनिर्माण, कामगार व<br>सेवायोजन राज्यमंत्री | - | सदस्य |
| सरदार तारासिंह एस. नंद्रजोग<br>अध्यक्ष, स्थायी समिती<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री. चंद्रकांत पडवळ<br>विधानसभा सदस्य | - | सदस्य |
| श्री. वसंत डावखरे<br>विधान परिषद सदस्य | - | सदस्य |
| श्री. दिनेश अफझुलपूरकर<br>शासनाचे मुख्य सचिव | - | सदस्य |
| श्री. के.नलिनाक्षन<br>शासनाचे प्रधान सचिव<br>नगर विकास विभाग | - | सदस्य |
| श्री. जयंत कावळे<br>शासनाचे सचिव<br>गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग | - | सदस्य |
| श्री. व्ही.एस. धुमाळ<br>व्यवस्थापकीय संचालक<br>सिडको | - | सदस्य |

श्री. के.सी. श्रीवास्तव - सदस्य-सचिव
महानगर आयुक्त

**निमंत्रित :**

श्री. नंद लाल
शासनाचे सचिव
नगर विकास विभाग

श्री. व्ही. रमणी
अतिरिक्त महापालिका आयुक्त
बृहन्मुंबई महानगरपालिका

सभेच्या प्रारंभी अध्यक्षांनी श्री. सुरेश जैन, गृहनिर्माण मंत्री यांचे पदाधिष्ठित सदस्य म्हणून मनःपूर्वक स्वागत केले.

त्यानंतर, माजी गृहनिर्माण मंत्री श्री. चंद्रकांत खैरे यांनी प्राधिकरणाचे सदस्य म्हणून बजावलेल्या बहुमोल सेवेचा अध्यक्षांनी गौरव केला.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ :** **वडाळा भारवाहक तळ (ट्रक टर्मिनल) येथील ए-१, बी-१, बी-२ आणि डी-२ इमारतीमधील रिकाम्या गाळ्यांचे वाटप -- भाडेपट्टा अधिमूल्य आणि गाळे वाटप यांना मंजूरी देणे.**

चर्चेनंतर विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.७२९ :**

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे पोटकलम (२) अनुसार मिळालेल्या अधिकारांचा आणि याबाबत सहाय्यभूत ठरणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे खाली दर्शविलेल्या ९ पात्र निविदाकारांचे देकार स्विकृत करीत असून त्यांना वडाळा भारवाहक तळातील खाली नमूद केल्याप्रमाणे

४ इमारतीमधील गाळे ३० वर्षाच्या भाडेपट्टयाने व प्रमाणभूत अटी व शर्तीवर वितरित करण्यास मान्यता देत आहे :-

| अ. क्र. | निविदा क्र. | निविदाकाराचे नाव | प्रवर्ग गाळा क्र. | चौ.मी.मध्ये क्षेत्र | चौ.मी.ला नमूद केलेली भाडेपट्टा अधिमूल्याची रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| | | **इमारत क्र. ए-१** | | | |
| १. | ५४ | कळवणकर हेमंत काशिनाथ | गोदाम क्र.५ | ४०.०७ | २२३३० |
| २. | ५३ | कळवणकर हेमंत काशिनाथ | गोदाम क्र.१९ | ४१.९३ | २२३३० |
| | | **इमारत क्र.बी-१** | | | |
| ३. | ३५ | तोडी एंटरप्राईजेस | कार्यालय क्र.११५ | ३५.१८ | १९२५० |
| ४. | ३४ | हनुमानप्रसाद लक्ष्मीनारायण (ट्रान्सपोर्ट) | कार्यालय क्र.१०४ | १७.१२ | १९२०० |
| ५. | ५१ | बॉम्बे टॅक्सी असोशिएशन को.ऑ.कन्झुमर्स सोसायटी लि. | कार्यालय क्र.१०५ | ३४.४५ | १९९०० |
| | | **इमारत क्र.बी-२** | | | |
| ६. | ४८ | सैनी मोहिंदरसिंग धन्नासिंग | गोदाम क्र.१ | ८२.५८ | १९८५८ |
| ७. | ६० | शाह आत्माराम सत्यनारायण | कार्यालय क्र.१०४ | १७.१२ | १९१५० |
| | | **इमारत क्र.डी-२** | | | |
| ८. | १९ | रसाळ सुखदेव श्रीपती | कार्यालय क्र.१२४ | ३३.४७ | १९४६६.६५ |
| ९. | ३७ | शिंदे राजेंद्र वसंत | कार्यालय क्र.१०८ | ३४.१८ | २००४०.९६ |

" पुढे असाही ठराव करण्यात येत आहे की, खाली दर्शविलेल्या पाच पात्र निविदाकारांना त्यांनी जेवढया क्षेत्रासाठी निविदा भरली होती तेवढे क्षेत्र कमी अथवा अधिक क्षेत्र असलेले गोदाम किंवा दुकान/कार्यालय यासाठी देकार देण्यात यावा. या गाळयासाठी आलेला उच्चतम

दर म्हणजे गोदामासाठी रु.२२३३०/- प्रति चौ.मी. आणि दुकान/कार्यालयासाठी रु.२००४१/- प्रति चौ.मी. आकारण्यात यावा. जर ते प्राधिकरणाचा देकार स्विकृत करण्यास तयार असतील तर ते भाडेपट्टा तत्वावर घेण्यास पसंत करतील ते गाळे त्यांना देण्यात यावेत :-

| अ. क्र. | निविदा क्र. | निविदाकाराचे नाव | प्रवर्ग गाळा क्र. | चौ.मी.मध्ये क्षेत्र | चौ.मी.ला नमूद केलेली भाडेपट्टा अधिमूल्याची रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| | | **इमारत क्र. ए-१** | | | |
| १. | ७० | गुप्ता ट्रान्सपोर्ट प्रा. लि. | गोदाम क्र.५ | ४०.०७ | २०१११ |
| | | **इमारत क्र.बी-१** | | | |
| २. | १८ | शेठ राजेश मधुकांत | कार्यालय क्र.१०५ | ३४.४५ | १९२०० |
| ३. | ६४ | सुरत गुडस् ट्रान्स. सर्व्हिसेस | दुकान क्र.१०४ | १७.१२ | १९१३८.०८ |
| ४. | ५८ | मल्लहोत्रा अमरजीत | कार्यालय क्र.१०४ | १७.१२ | १९१५८.८८ |
| | | **इमारत क्र. डी-२** | | | |
| ५. | ७९ | ओरिएन्ट एंटरप्राईजेस | कार्यालय क्र.१०८ | ३४.१८ | १९५०० |

"आणखी पुढे असाही ठराव करण्यात येत आहे की, खाली दर्शविलेले ३ निविदाकार अपात्र ठरल्यामुळे त्यांच्या निविदा नाकारण्यात येत आहे व त्यांनी निविदेसोबत भरलेली अनामत रक्कम त्यांना परत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे :-

| अ क्र | निविदा क्र. | निविदाकाराचे नाव | प्रवर्ग गाळा क्र. | चौ.मी. मध्ये क्षेत्र | चौ.मी.ला नमूद केलेली भाडेपट्टा अधिमूल्याची रक्कम (रु.) | अनामत रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **इमारत क्र. ए-१** | | | | |
| १ | ४९ | सैनी प्रेमसिंग धन्नासिंग | टायर/ बॅटरी शॉप क्र.३२ | ३४.२८ | २२१५८ | ९५०० |
| २ | ६७ | माहिधर हरी चमनलाल | टायर/ बॅटरी शॉप क्र.३२ | ३४.२८ | १९५१० | ९५०० |
| | | **इमारत क्र. डी-२** | | | | |
| ३ | ७३ | पुरोहित परसराम गौरीशंकर | गोदाम क्र.४ | ४३८. ३९ | १९१३८ | ८५००० |

" पुढे असाही ठराव करण्यात येत आहे की, वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.२ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या प्रतिनिधी मंडळाचा अभ्यास दौरा**

या विषयावरील चर्चेच्यावेळी प्राधिकरणाचे आणि/किंवा महानगरातील काही मुख्य प्रकल्प 'बांधा-वापर करा-हस्तांतरण करा' (बीओटी) वगैरे तत्वावर हाती घेता येतील का याचा विचार करुन त्या योजनेच्या अनुषंगाने प्रस्तावित पदरेश दौ-याचे आयोजन करावे असे सूचविण्यात आले. त्यानुसार प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.७३० :**

" असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियमाचे कलम १२(१) (एल) अनुसार व या संदर्भात सहाय्यभूत असलेल्या इतर सर्व शक्तींचा वापर करुन, पुढील पाच सदस्य असलेल्या प्रतिनिधीमंडळाचा १८ दिवसांचा लंडन, पॅरिस, न्यूयॉर्क,

वॉशिंग्टन आणि लॉसएंजल्स या शहरास भेट देण्याच्या अभ्यास दौ-यास व त्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास निधीमधून रु.१५ लाख पर्यंत खर्च करण्यास याद्वारे प्राधिकरण तत्वतः मान्यता देत आहेः-

(अ) प्राधिकरणाचे अध्यक्ष अथवा इतर वरिष्ठ सदस्य
(ब) प्राधिकरणाचे दोन अशासकीय सदस्य
(क) महानगर आयुक्त,
(ड) प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग

"यापुढे असाही ठराव करण्यात येत आहे की, प्राधिकरणाचे आणि/किंवा महानगरातील काही मुख्य प्रकल्प 'बांधा-वापर करा-हस्तांतरण करा' (बीओटी) वगैरे तत्वावर हाती घेता येतील का याचा विचार करुन त्या योजनेच्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीचे अध्यक्ष व महानगर प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या संमतीने परदेश दौ-याचे आयोजन करण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

"यापुढे असाही ठराव करण्यात येत आहे की, वरील प्रतिनिधीमंडळाचा प्रमुख व दोन अशासकीय सदस्य नियुक्त करण्याचे अधिकार महानगर प्राधिकरणाच्या अध्यक्षांना याद्वारे देण्यात येत आहेत.

"यापुढे असाही ठराव करण्यात येत आहे की, प्रतिनिधीमंडळाच्या अभ्यास दौ-याच्या संदर्भात राज्य शासन व केंद्र शासनाकडून आवश्यक ती परवानगी मिळविण्याच्या दृष्टीने तसेच प्रतिनिधीमंडळाच्या अभ्यास दौ-याच्या संदर्भात सर्व आवश्यक कार्यवाही करण्यासाठी महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र. ३ : मुंबई महानगर प्रदेशासाठी प्रारुप प्रादेशिक योजना १९९६-२०११ नियोजन समितीचा अहवाल**

३.१ महानगर आयुक्तांनी प्रारुप प्रादेशिक योजनेसंबंधी जनतेकडून प्राप्त झालेल्या सूचना व हरकतींचा विचार करण्यासाठी प्राधिकरणाने गठीत केलेल्या नियोजन समितीपुढे झालेल्या सुनावणीबद्दल प्राधिकरणाला संक्षेपाने माहिती दिली.

३.२ प्रमुख, नियोजन विभाग यांनी प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांचे स्वरुप, वर्गीकरण व त्यातील सूचना व हरकतींचे ठळक मुद्दे विशद केले. प्रमुख, नियोजन विभाग यांनी धोरणात्मक गोष्टी, जमीन वापर व विकास नियंत्रण याबद्दल जनतेने उपस्थित केलेल्या मुद्यांचे व त्यासंबंधातील नियोजन समितीच्या शिफारशींचे स्लाईडद्वारे स्पष्टीकरण केले. त्यामध्ये प्रामुख्याने पुढील विषयांचा समावेश होता:- (१) रेवस मांडवा विभागातील दुसरा आंतरराष्ट्रीय विमानतळ (२) गाढी – कासाडी नद्यांच्या खो-यात पूर नियंत्रण व पाणी पुरवठा (३) पेण-अलिबाग तहसिलात (प्रस्तावित) नागरी जमीन वापर (४) खोपटा नवीन शहर (५) पनवेल-रासायनी विभागातील प्रास्तावित जमीन वापर (६) मुंबई-पुणे द्रुत गती मार्गाजवळील नागरीकरण विभाग (७) धरमतर खाडीवरील लहान धक्के व वखारी यांचा विकास (८) वन व खाण विभागाबद्दलचे धोरण (९) मनोरंजन व पर्यटन विकास (१०) गावठाण विस्तार आणि (११) हरित विभाग-१ व हरित विभाग-२ यामधील जमीन वापरासंबंधीच्या तरतुदीबाबत सभासदांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांबद्दल आयुक्त व प्रमुख, नियोजन विभाग यांनी स्पष्टीकरण केले.

३.३ नियोजन समितींच्या अहवालातील शिफारशींव्यतिरिक्त खालील मुद्दे प्राधिकरणाच्या विचारार्थ मांडण्यात आले होते :-

अ) धरमतर खाडीशिवाय मुंबई महानगर प्रदेशातील इतर खाडयांमध्ये जल वाहतुकीसाठी लहान धक्के व वखारी बांधण्यास परवानगी द्यावी असे सुचविण्यात आले.

ब) गांवठाणपासून २०० मी. पर्यंत संमत प्रादेशिक योजनेप्रमाणे अनुज्ञेय असलेल्या विकासाच्या संदर्भात नियोजन समितीच्या खालील शिफारशी मान्य करुन त्याप्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हाधिका-यांना द्यावेत :-

खालील प्रकरणामध्ये मंजूर प्रादेशिक योजनेतील तरतुदींना अधीन राहून परवानग्या देण्यात याव्यात.

(१) जेथे बिगर शेती उपयोगासाठी विक्री करण्याची परवानगी १५.१.१९९६ पूर्वी दिलेली असेल

(२) जेथे बिगर शेती परवानगी, अभिन्यास वा भूखंड विभाजन (layout and sub -division) परवानगी किंवा इमारत परवानगी हया १५.१.१९९६ पूर्वी मंजूर केल्या असतील.

(३) १५.१.१९९६ पूर्वी मान्यता दिलेल्या अभिन्यास वा भूखंड विभाजनातील व्यक्तीगत भूखंडावरील इमारतीला परवानगी तसेच इमारतीच्या नकाशात सुधारणा करण्यास परवानगी

(४) जेथे दिनांक १५.१.१९९६ पूर्वी बिगर शेती परवानगी, अभिन्यास वा भूखंड विभाजन परवानगी किंवा इमारत बांधणीसाठी अर्ज करण्यात आला आहे. तेथे मुं.म.प्र.वि.च्या पूर्व परवानगीने

३.४ नियोजन समितीच्या अहवालाच्या संदर्भात खाली नमूद केलेल्या सूचना बैठकीत करण्यात आल्या :- (१) दुस-या आंतरराष्ट्रीय विमानतळाचे राज्याच्या दृष्टीने महत्व लक्षात घेऊन नवी मुंबईतील जागेसह सर्व पर्यायी जागा प्रारुप प्रादेशिक योजनेच्या नकाशावर दाखविण्यात याव्यात, (२) प्रारुप प्रादेशिक योजनेत प्रस्तावित केल्याप्रमाणे धरमतर खाडीसहीत मुंबई महानगर प्रदेशातील इतर खाडयांमध्ये सुध्दा वखारींसह लहान धक्क्यांची ( जेटी ) उभारणी अनुज्ञेय करावी, (३) मुंबई-पुणे महामार्गावर सार्वजनिक बांधकाम विभागाने सुचविलेली जागा नागरीकरण विभागात अंतर्भूत करावी व नकाशावर दाखवावी, (४) खाण विभाग, आवश्यक ती माहिती घेऊन निश्चित करण्यात यावेत व असे विभाग स्वतंत्रपणे दाखविण्यात यावेत त्याशिवाय हरित - विभागात प्राधिकरणाच्या पूर्व परवानगीने व आवश्यक ती पर्यावरण विषयक काळजी घेऊन खाणकाम अनुज्ञेय करण्यात यावे, (५) प्रादेशिक योजनेतील प्रस्तावित केलेल्या धोरणाव्यतिरिक्त कार्यालयीन जमीन वापर (ऑफिस युज) झोपडपट्टी पुर्नविकासात अनुज्ञेय करावा. सदर वापर एकूण मुक्त विक्री चटई क्षेत्राच्या २०% एवढा मर्यादित ठेवावा व त्याचा विकास मुंबई शहर विभागात अनुज्ञेय करावा, (६) मनोरंजन व पर्यटनासाठी उपयुक्त क्षेत्र नव्या मुंबईसहीत समुद्र किना-याने इतरत्रही दाखविण्यात यावेत, (७) हरित विभाग-२ मध्ये फार्म हाऊसेस् अनुज्ञेय करावीत.

३.५ मा. अध्यक्षांनी शासनाकडे वर्ग असलेल्या महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील सर्व सरकारी जमिनी दाखविणारा नकाशा तयार करण्याबद्‌दल सुचविले. हा नकाशा माहितीसाठी व भूसंपादनाशिवाय जागेची उपलब्धता कोठे आहे हे समजावून घेण्याच्या दृष्टीने उपयोगी पडेल.

आंतरराष्ट्रीय विमानतळ महाराष्ट्रातच राहावा हयावर अध्यक्षांनी भर दिला. त्यांनी असेही नमूद केले की, हया विमानतळासाठी सखोल शक्याशक्यता अभ्यास करण्यासाठी मुंबई एअरपोर्ट अलायन्स बरोबर एक सामंजस्य करार करण्यात आला आहे. आवश्यक असल्यास मुंबई एअरपोर्ट अलायन्स बरोबर चर्चा करुन हया अभ्यासास गती द्यावी.

३.६ वरील चर्चेच्या आधारे पुढील निर्णय घेण्यात आले व त्यानुसार प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

(१) नियोजन समितीच्या अहवाल परिच्छेद ३.४ मधील सूचनांसह स्विकृत करावा,

(२) परिच्छेद ३.४ मधील सूचनांच्या अधीन राहून नियोजन समितीच्या शिफारशींप्रमाणे प्रारुप प्रादेशिक योजनेत बदल करावेत,

(३) त्यानुसार सुधारित प्रारुप प्रादेशिक योजना, नियोजन समितीच्या अहवाल व त्यावरील प्राधिकरणाचे निर्णय यासह शासनास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या तरतुदीनुसार मान्यतेसाठी सादर करण्यात यावी,

(४) वरील व तदनुषंगिक कार्यवाहीसाठी महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात यावे व

(५) परिच्छेद क्र.३.३ मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे महानगर आयुक्तांनी जिल्हाधिका-यांना निर्देश द्यावेत.

<u>ठराव क्र.७३१</u> :-

"असा ठराव करण्यात येत आहे की, प्राधिकरणाने या बाबतीत केलेल्या सूचनांच्या आधीन राहून नियोजन समितीने तयार केलेला अहवाल स्विकारण्यात यावा व त्याप्रमाणे प्रारुप प्रादेशिक योजनेमध्ये योग्य त्या दुरुस्त्या करण्यात याव्यात. अशी प्रारुप प्रादेशिक योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील तरतूदींप्रमाणे शासनाला मंजुरीसाठी पाठविण्यात यावी. त्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात यावे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, प्रारुप प्रादेशिक योजनेच्या प्रसिध्दीमुळे, संमत प्रादेशिक योजनेतील प्रस्तावांप्रमाणे "गांवठाण विस्तार" हया शिर्षकाखाली अंतर्भूत होणारी प्रकरणे मंजूर प्रादेशिक योजनेतील तरतूदींप्रमाणे अनुज्ञेय करण्यात यावी व याबद्दल महानगर आयुक्तांनी जिल्हाधिकारी ठाणे व रायगड यांना योग्य ते निर्देश द्यावेत."

**<u>बाब क्र. ५</u> : त्रिपक्षीय कराराअंतर्गत पवई क्षेत्र विकास योजनेमधील <u>विकासकांनी केलेल्या विकास कामांचा अहवाल</u>**

या विषयावरील चर्चेच्यावेळी त्रिपक्षीय कराराच्या बाबतीत असे निदर्शनास आणण्यात आले की, श्री. यशवंत वि. चंद्रचूड, भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे पूर्वीचे सरन्यायाधीश यांनी विकासकास दिलेला सल्ला, तसेच प्राधिकरणाचे विधी सल्लागार यांनी दिलेला सल्ला, तसेच राज्य शासनाचे प्रधान सचिव, न्याय व विधी विभाग यांनी दिलेले अभिप्राय यानुसार विहित कालमर्यादेत भारत सरकार व त्यांचे संबंधित विभागांनी देकार न स्विकारल्यामुळे भूधारकांनी त्याच्याकडे ठेवलेल्या ४२ हेक्टर इतक्या जमिनीवरील बांधकाम क्षेत्राच्या १५% इतके बांधकाम क्षेत्र शासनास विक्री करण्यास भूधारक बांधील नाही. मात्र प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीचे असे मत आहे की, वर उल्लेख केलेल्या ४२ हेक्टर जमिनीवरील १५% बांधकाम क्षेत्र त्रिपक्षीय करारात नमूद केल्याप्रमाणे

शासनास विकण्यास भूधारक बांधील आहे आणि विक्रीच्या दर करारात प्रथम नमूद केल्याप्रमाणे म्हणजे बांधकाम क्षेत्राच्या प्रति चौरस फुटास रु.१३५/- हा असेल. अशाप्रकारे प्राधिकरणासमोर दोन भिन्न मते आल्यामुळे याबाबतीत राज्य शासनाचे महाअधिवक्ता (ॲडव्होकेट जनरल) यांच्या निदर्शनास दोन्ही भिन्न मते व त्या संबंधातील कागदपत्रे आणून त्यांच्याकडून कायदेशीर सल्ला घ्यावा व त्यासहीत विषय शक्यतो प्राधिकरणाच्या पुढील बैठकी समोर ठेवावा असे प्राधिकरणाने ठरविले.

त्यानंतर, प्राधिकरणाने खालील नमूद केलेल्या बाब क्र. ६ व १५ यावर एकत्रितपणे विचार केला :

**<u>बाब क्र.६</u> :** **वांद्रे-कुर्ला संकुलातील आंतरराष्ट्रीय वित्त व व्यवसाय <u>केंद्रामध्ये अधिवेशन केंद्र-नि-हॉटेल विकसित करणे</u>**

**<u>बाब क्र.१५</u> :** **वांद्रे-कुर्ला संकुलातील आंतरराष्ट्रीय वित्त व व्यवसाय केंद्रामध्ये अधिवेशन केंद्र-नि-हॉटेल विकसित करणे बाबत व त्यासाठी <u>भरावयाच्या अधिमूल्याची रक्कम भरणेस मुदतवाढ मिळणेबाबत</u>**

चर्चेनंतर, प्राधिकरणाने बाब क्र.१५ च्या विषय टिप्पणीतील शेवटच्या परिच्छेदात नमूद केलेल्या प्रस्तावामध्ये खालील प्रमाणे बदल केले :-

(१) जरी परिषद केंद्र व हॉटेल यासाठी राखून ठेवलेला भूखंड हा तटीय विनियमन क्षेत्राच्या (कोस्टल रेग्युलेशन झोन) बाहेर असला तरी सुध्दा वांद्रे-कुर्ला समुहाच्या विकासाचे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे हॉटेलचा भूखंड नेमून दिलेल्या संस्थेने म्हणजे दि इंडियन हॉटेल्स कं. लि. यांनी शंका व्यक्त केल्यामुळे त्यांना निविदेतील अटींप्रमाणे भरावयाच्या म्हणजे रु.२१७,५६,६०,००० च्या २०% रक्कम (१०% ऐवजी) म्हणजे रु.४३,५१,३२,००० वजा रु.५,००,००,००० इसारा रक्कम दिनांक १६ जुलै, १९९७ पर्यंत भरण्याची सवलत द्यावी.

(२) उर्वरित ८०% रक्कम म्हणजे रु.१७४,०५,२८,००० त्यांना उच्च न्यायालयाचा निर्णय लागल्यापासून एक महिन्याच्या आत भरण्यास मुदतवाढ व्याज न आकारता देण्यात यावी.

त्यानुसार प्राधिकरणाने खालील प्रमाणे ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र.७३२</u> :**

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे पोटकलम (२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि

त्याबाबतीत त्यास सहाय्यभूत असणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन तसेच प्राधिकरणाच्या दिनांक १० मार्च, १९९७ चा ठराव क्र. ७१४ मध्ये अंशतः फेरफार करुन, प्राधिकरण विषय टिप्पणीत नमूद केलेल्या कारणासाठी वांद्रे-कुर्ला समुहातील हॉटेल्स व सर्व्हिस (हॉटेल्स) दालने, कार्यालये तथा दुकाने यासाठीचा भूखंड नेमून दिलेल्या संस्थेस म्हणजे दि इंडियन हॉटेल्स कं.लि. यांना त्यांनी रोखीने भरावयाचे अधिमूल्य खाली नमूद केल्याप्रमाणे भरण्यास प्राधिकरण याद्वारे सवलती देत आहे :-

(१) रु.२१७,५६,६०,००० रुपयाच्या २०% म्हणजे रु.४३,५१,३२,००० रक्कम वजा रु.५,००,००,००० इसारा रक्कम म्हणजे रु.३८,५१,३२,५०० दिनांक १६ जुलै, १९९७ पर्यंत भरण्यात यावी.

(२) उर्वरित ८०% रक्कम म्हणजे रु.१७४,०५,२८,००० उच्च न्यायालयाचा निकाल प्राधिकरणाच्या बाजूने लागल्यास एक महिन्याच्या आत भरण्यास मुदतवाढ देण्यात यावी.

(३) उच्च न्यायालयाचा निकाल काही कारणामुळे प्राधिकरणाच्या विरुध्द गेल्यास उर्वरित रकमेची मागणी करण्यात येऊ नये व सर्वोच्च न्यायालयाचा निकाल लागेपर्यंत उर्वरित रक्कम घेऊ नये.

(४) सर्वोच्च न्यायालयात निकाल प्राधिकरणाच्या विरुध्द गेल्यास कंपनीने वेळोवेळी भरलेली रक्कम प्राधिकरण ठरविल त्या व्याजाच्या दराने परत करावी.

"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, वरील प्रमाणे दि इंडियन हॉटेल्स कं.लि. यांना तावडतोब कळविण्यास व या ठरावाची अंमलबजावणी होण्यासाठी काही अनुषंगीक बदल करावे लागल्यास तसे ते करण्यासाठी महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.१३</u> : <u>प्राधिकरणाकडून महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघास अल्प मुदत ठेव रु.१०० कोटी देण्याबाबत</u>**

विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :

**<u>ठराव क्र.७३३</u>:**

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने शासकीय आदेशानुसार रु.१०० कोटी इतकी ठेव महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघाकडे दरमहा १८% व्याज्याच्या दराने (धनादेश दिनांकापासून) तीन ते चार महिन्याकरीता म्हणजेच ऑक्टोबर,१९९७ पर्यंत ठेवण्यास प्राधिकरण याद्वारे कार्योत्तर मंजूरी देत आहे. ही ठेव शासकीय निर्णय दिनांक ६ ऑक्टोबर, १९९५ मधील गुंतवणुकीच्या मार्गदर्शक तत्वातील अटी व शर्ती क्र.४, महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शिथिल करेल हे गृहीत करुन अदा करण्यात आलेली आहे.

"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघाकरीता मागणी केल्यास आणखी जास्तीत जास्त रु.१०० कोटी जादा रक्कम शासकीय निर्णय दिनांक ६ ऑक्टोबर, १९९५ मधील गुंतवणुकीच्या मार्गदर्शक तत्वातील अटी व शर्ती क्र.४ शिथिल केल्यावर अल्प कालावधीसाठी देण्याकरीता महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करीत आहे."

**बाब क्र.१६ : मुंबई नागरी परिवहन प्रकल्प -२ (एमयुटीपी-२) व मुंबई-पुनर्वसाहत व पुनर्वसन प्रकल्प - सद्यस्थिती व प्रस्तावित पुढील कार्यवाही**

विषय टिप्पणीतील सद्यस्थिती अहवालाची नोंद घेऊन प्राधिकरणाने विषय टिप्पणीत सूचविल्याप्रमाणे दोन समित्या नेमण्याचा प्रस्ताव मान्य करुन खालील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.७३४ :**

" असा ठराव करण्यात येत आहे की, (१) मुंबई नागरी परिवहन प्रकल्प-२ चे संनियंत्रण करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक उच्च स्तरीय समिती स्थापन करणे व (२) वरील प्रकल्पाचे बाबतीत केंद्र सरकार व राज्य शासन यांच्यामध्ये समन्वयासाठी संबंधित अधिका-यांची एक सुकाणू समिती स्थापन करणे या प्रस्तावास प्राधिकरण मान्यता देत आहे व त्यासंबंधी पुढील कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करीत आहे."

**बाब क्र.१७ : प्राधिकरणाकडे असलेला अतिरिक्त निधी गुंतविण्याबाबत**

विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :

**ठराव क्र.७३५ :**

"असा ठराव करण्यात येत आहे की, वित्तीय बाजारातील सद्य परिस्थिती पहाता शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्वानुसार अतिरिक्त निधी गुंतविताना केवळ जास्त व्याजाच्या दरास प्राधान्य न देता सुरक्षित गुंतवणूक व व्याजाचा दर हया दोन्हीचा विचार करुन प्राधिकरणाकडे असलेला अतिरिक्त निधी विविध वित्तीय संस्थांमध्ये कमीअधिक प्रमाणात गुंतविण्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना देण्यात येत आहेत."

**<u>बाब क्र.१८ :</u> महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेमधील संचालक या पदावर प्रतिनियुक्तीने नेमणूक करण्याबाबत**

विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :

**<u>ठराव क्र.७३६</u> :**

"असा ठराव करण्यात येत आहे की, महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेच्या नियम क्र.३३ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे श्री. एन.बी.म्हसकर, अधिक्षक अभियंता, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांची प्रथमतः एक वर्षाच्या कालावधीकरीता नेहमीच्या अटी व शर्तीनुसार महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेतील संचालक या पदावर प्रतिनियुक्तीवर नेमणूक करण्यास याद्वारे मान्यता देत आहे.

"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, श्री. म्हसकर, यांचे प्रतिनियुक्ती कालावधीतील काम चांगले असल्यास त्यांचा प्रतिनियुक्ती कालावधी १-१ वर्षे असे एकूण आणखी २ वर्षासाठी वाढविण्यासाठी महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

वेळे अभावी बाब क्र.४, ७ ते १२ व १४ वर विचार करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

त्यानंतर, अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

***************